ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.


टेलि. ५५६२७


दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ पुणें, बुधवार, ६ जानेवारी १९६५ अंक १

## प्रगतीचीं दोन चक्रें...






## शेती व उद्योगधंदे

उद्योगधंद्याचीं चक्रें अव्याहत फिरतीं ठेवण्यासाठीं पाण्याचा सतत पुरवठा पाहिजे असतो, रसायनें आणि द्रवपदार्थ इकडून तिकडे न्यावे लागतात, मलिन पदार्थांचा निचरा करावा लागतो. हीं कामें पंपांच्या सहाय्यानें होतात. कारखान्यांत आणि शेतीसाठीं पदोपदीं पंपांची गरज असते. ही गरज **किर्लोस्कर पंप** उत्तम प्रकारें भागवीत आहेत.

किर्लोस्कर

पंपनिर्मितींत अग्रेसर



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी – जिल्हा सांगली.

STUSA KM 9/64

**ओरिसा राज्याची प्रगति**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ओरिसा राज्यानें पाटबंधारे आणि विद्युत्निर्मिति ह्यांच्या बाबतींत प्रगति केली आहे. राज्याच्या पहिल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमांत मिळून ९ लाख एकर जमीन ओलिताखाली आणण्यांत आली होती. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणखी ८६ लाख एकर जमीन ओलिताखाली येईल.

**मोठ्या शहरांतील वाहतुकीबाबत सल्ला**—अमेरिकेंतील लॉस एंजल्स ह्या शहराचे पोलिसप्रमुख भारतांत आले आहेत. गृहखात्याच्या आमंत्रणावरून त्यांनीं हा दौरा काढला आहे. मोठ्या शहरांतील अवजड वाहनांचें नियंत्रण कसें करावें ह्याबाबत ते स्थानिक अधिकाऱ्यांना सल्ला देणार आहेत. वाहतूक कार्यक्षम करण्यासाठी ते शिफारसी करतील.

**सुरतगड शेतवाडीला तोटा**—राजस्थानांत सुरतगढ येथें स्थापन करण्यांत आलेल्या मोठ्या यंत्रसिद्ध शेतवाडीला १९६३-६४ सालीं ११ लाख ७६ हजार रुपयांवर तोटा आला. पाण्याचा अपुरा व अनियमित पुरवठा, नद्यांना आलेले पूर, हिवाळी पावसाचा अभाव आणि कडक थंडी ह्या कारणांनीं शेतींतील पिकांचें नुकसान झालें, ही यांत्रिक शेती रशिआच्या मदतीनें स्थापन करण्यांत आली आहे.

**कॉर्पोरेशनच्या धंद्यांत घट**—१९६३–६४ सालीं आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या नव्या धंद्यांत ५ कोटी रुपये किमतीची घट झाली आहे. अशी माहिती अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं सांगितली. धंद्याची वाढ समाधानकारकपणें करण्यासाठीं कॉर्पोरेशनचे प्रयत्न चालू आहेत. मध्यवर्ती सरकारहि ह्या बाबतींत लक्ष घालीत आहे.




# अर्थ

बुधवार, ६ जानेवारी, १९६५





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


### ग्रामीण भागांत बचतीचा प्रसार झाला पाहिजे

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांनीं कलकत्ता येथें युनिट ट्रस्टच्या पहिल्या शाखेचें उद्‌घाटन केलें. त्या वेळीं ते म्हणाले कीं, गेल्या कांहीं महिन्यांत अन्नधान्याच्या किंमती वाढलेल्या आहेत. त्यामुळें शेतकऱ्यांच्या हातांत बराच अधिक पैसा खेळूं लागला आहे. ह्या पैशापैकी कांहीं हिस्सा युनिट ट्रस्टमधील गुंतवणुकीच्या रूपानें बचत केला गेला पाहिजे. ग्रामीण भागांतील पैसा बचत करून जितका अधिक गोळा होईल तितका करण्यांत आला पाहिजे. अलीकडे ग्रामीण विभागांत आर्थिक विकास झालेला आहे. त्यामुळें युनिट ट्रस्ट संघटनेनें आपल्या कार्यक्षेत्राचा तिकडे मोर्चा वळविल्यास तेथील शिलकी पैसा बचतीच्या मार्गानें आकर्षून घेणें शक्य आहे. युनिट ट्रस्टमधील गुंतवणुकीमुळें दुसऱ्याहि कांहीं गोष्टी साधतां येतील. नव्या डिबेंचर शेअर्सच्या खरेदींत भाग घेऊन भांडवलाच्या बाजाराला बळकटी आणण्याचें कार्य ट्रस्ट करूं शकेल. ह्या बाबतींत ट्रस्टनें थोडीबहुत प्रगति केलेली आहे. ट्रस्टच्या ह्या कार्याचा व्याप वाढत गेला तर त्यामुळें भांडवल-गुंतवणुकीला चालना मिळेल आणि त्याचबरोबर देशांतील बँकिंगच्या व्यवसायावरील ताणहि कमी होईल. लोकांकडून युनिट ट्रस्टला आतांपर्यंतच चांगला पाठिंबा मिळाला आहे. ह्या बाबतींत एक गोष्ट महत्त्वाची आहे. लोकांना पैसे गुंतविण्यासाठी दुसऱ्याहि बचतयोजना उपलब्ध आहेत. ह्या योजनांत ठरविण्यांत आलेल्या कार्यक्रमावर परिणाम घडून न येतां युनिट ट्रस्टला लोकांचा पाठिंबा मिळालेला आहे. १९६३–६४ सालीं अल्प बचतयोजना-मधील गुंतवणुकीनें उच्चांक गांठलेला आहे. ह्यावरून युनिट ट्रस्टच्या उपक्रमामुळें इतर बचतयोजनांवर विपरीत परिणाम झालेला नाहीं हें दिसून येतें.

### रशिआंतील राज्यशासन विचारांत बदल ?

रशिआंत राज्यशासनसंस्थेच्या स्वरूपाबद्दल नवीन मंथन सुरू झाल्याचीं लक्षणें दिसत आहेत. रशिआचे माजी पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांच्या ठिकाणीं कम्युनिस्ट पक्षाची सरचिटणिसी आणि पंतप्रधानकी ह्या दोन्ही जागा एकवटलेल्या होत्या. त्यांच्यानंतर ह्या अधिकारपदांची विभागणी करण्यांत आली. रशिआंतील समाजांत लोकशाही प्रथांची स्थापना करून तो अधिक लोकाभि-मुख करण्याचें धोरण रशिआच्या नव्या पुढाऱ्यांनीं स्वीकारलेलें दिसत आहे. ह्यासंबंधीं 'प्रावदा' ह्या कम्युनिस्ट पक्षाच्या वृत्त-पत्रांत प्रदीर्घ चर्चा करणारा लेख प्रसिद्ध करण्यांत आला आहे. भांडवलशाही समाजांत अधिकारावर असलेली राज्यशासनसंस्था व राज्ययंत्रणा क्रांतीच्या मार्गानें उलथून टाकल्यावर, त्या जागीं कामगारांची हुकूमशाही गाजविणारी राज्यसंस्था स्थापन करण्यांत आली पाहिजे. कारण नव्या राजवटीला विरोध करणारे वर्ग क्रांती-नंतरहि अस्तित्वांत असतात असा मार्क्सवादी राज्यशास्त्राचा सिद्धांतच आहे. 'प्रावदांत' प्रसिद्ध करण्यांत आलेल्या लेखांत ह्यापुढें रशिआंतील राज्यशासनसंस्था सर्व लोकांचें प्रतिनिधित्व करणारी झाली पाहिजे असा विचार मांडण्यांत आला आहे. सोव्हिएट रशिआंतील राज्यशासनसंस्था अस्तित्वांत येऊन आतां बराच काळ लोटलेला आहे. त्यामुळें तिला विरोध करणारे वर्ग आतां नाहींसे झालेले आहेत. शिवाय, रशिअन क्रांतीच्या काळा-नंतर झालेल्या आर्थिक व सामाजिक विकासामुळें खुद्द रशिअन समाजाचें स्वरूप पुरेसें एकजिनसी झालेलें आहे. अशा परिस्थितींत समाजांतील एकाच वर्गाची हुकूमशाही सर्व समाजावर गाजविण्याचें कारण उरलेलें नाहीं असेंहि प्रतिपादन उपरोक्त लेखांत करण्यांत आलें आहे. रशिआंतील समाजाचा चेहरामोहरा गेल्या कांहीं वर्षांत बदलला. आतां त्याच्या राजकीय प्रेरणाहि बदलत आहेत असें दिसतें.

### नागपूरजवळ दगडी कोळशाचा मोठा साठा

इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्स ह्या संघटनेनें नागपूरपासून बारा मैलांवरील दगडी कोळशाच्या भूमिगत साठ्याचा शोध लावला आहे. हा साठा सुमारें ७० कोटी टन असावा असा अंदाज आहे. कोळशाची प्रत मात्र हलकी आहे. परंतु तरीहि त्याचे महत्त्व कमी लेखण्याचें कारण नाहीं. ह्या कोळशाचा उपयोग औष्णिक वीजकेंद्रें उभारण्यासाठी करतां येतो. त्याचप्रमाणें त्यापासून घरगुती जळणासाठी लागणारा गॅसहि मिळूं शकतो, आणि एक प्रकारचें द्रव जळणहि त्यापासून तयार करतां येतें. चांगल्या प्रतीचा कोळसा मुख्यत: खनिज धातुनिर्मितींत वापरला जातो. भारतांत अशा प्रकारचा कोळसा विपुल प्रमाणांत नाहीं. त्यामुळें त्याच्या वापरावरील ताण कमी प्रतीच्या कोळशाच्या वापरानें कमी करता आला तर तें इष्टच ठरेल. नागपूरजवळ उपलब्ध झालेल्या कोळशाच्या साठ्याला आणखी एका दृष्टीनें महत्त्व आहे. पश्चिम भारतामधील उद्योगधंद्यांना लागणारा कोळसा सध्या बंगाल–बिहारमधील कोळसाखाणीमधून आणावा लागतो. नागपूरजवळील कोळसा काढण्यांत येऊं लागल्यावर त्याची वाहतूक कमी अंतरावरून करतां येईल आणि साहजिकच किंमतहि घटेल. कोळशाच्या दूरवर अंतरावरून होणाऱ्या वाहतुकीमुळे रेल्वेवाहतुकीवर पुष्कळदा फार ताण पडतो आणि कांहीं वेळां कोळशाचा पुरवठा खंडित होतो. पश्चिम भारतांत औद्योगिक शक्ती म्हणून विजेचा वापर वाढत असला तरी अजून बरीच वर्षे विजेचा मुबलक पुरवठा होणें कठीण आहे. तेव्हां दरम्यानच्या काळांत कोळशाचा उपयोग चालूच राहणार ह्यांत शंका नाहीं. पश्चिम भारताप्रमाणेंच म्हैसूरच्या उत्तर भागांतील उद्योगधंद्यांनाहि नागपूरजवळील कोळशाचा उपयोग होईल.

### अंदाजपत्रक नेहमीपेक्षा एक दिवस आधीं

मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक लोकसभेस शनिवार, दि. २७ फेब्रुवारी रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां सादर केलें जाईल. अंदाजपत्रक फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशीं मांडण्याचा प्रघात आहे, पण यंदा त्या दिवशीं रविवार येत आहे आणि लोकसभेची बैठक रविवारीं भरत नाहीं. म्हणून आधीं एक दिवस तें मांडलें जाईल.

## राष्ट्रीय लघुउद्योगमंडळाचें कार्य

राष्ट्रीय लघुउद्योगमंडळाची वार्षिक सभा मंडळाचे अध्यक्ष श्री सी. आर. सुंदरम् ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. मंडळाच्या मार्फत प्रत्यक्ष उत्पादनाचीं आणि कुशल कामगारांना शिक्षण देण्याचीं तीन केंद्रें चालविण्यांत येतात. हीं केंद्रें सौराष्ट्रांत राजकोट, दिल्लीजवळ ओखला आणि हौरा ह्या ठिकाणीं आहेत. ह्या केंद्रांतून देशांतील उमेदवार कामगारांनाच नव्हे तर परदेशांतील कामगारांनाहि शिक्षण देण्यांत येतें. केंद्रांच्या स्थापनेच्या कामीं अमेरिका, जर्मनी व जपान ह्या देशांची मदत घेण्यांत आली आहे. कुशल कामगार, पर्यवेक्षक आणि चालक अशा तिन्ही प्रकारचीं माणसें केंद्रांतून शिकवून तयार करण्यांत येतात. सभेंत बोलतांना श्री. सुंदरम् म्हणाले कीं, मंडळाच्या कार्यांत परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईमुळें अडचणी निर्माण झाल्या. परंतु तरीसुद्धां १९६३–६४ सालीं मंडळाकडे २ कोटी रुपयांच्या यंत्रसामग्रीच्या व उपकरणांच्या मागण्या नोंदविता येणें शक्य झालें. मंडळ छोट्या उद्योगधंद्यांना हप्तेबंदीनें यंत्र-सामग्री पुरवीत असते. अहवालाच्या वर्षांत ह्या पद्धतीनें ५·४१ कोटी रुपयांची यंत्रसामग्री पुरविण्यांत आली. त्या मागील सालीं ३·२२ कोटी रुपयांची यंत्रसामग्री पुरविण्यांत आली होती. अहवालाच्या वर्षी मंडळाची उलाढाल चांगली झाली. त्यामुळें मंडळाला ३३·३३ लाख रुपयांचा निवळ नफा झाला. त्या मागील वर्षी १४·३८ लाख रुपये नफा झाला होता. नफा मिळविण्याच्या कामीं निर्यातीचाहि उपयोग झाला आहे. मंडळानें ७७·२२ लाख रुपये किंमतीच्या २ लाख, ७५ हजार बूटजोड्या निर्यात केल्या. त्या मागील वर्षी मंडळानें १ लाख, २१ हजार बूटजोड्या निर्यात केल्या होत्या. त्यांची किंमत ३२·३६ लाख रुपये होती.

---

## आय. ए. एस. ची आकर्षकता घटत चालली

हिंदी तरुणांना इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस ह्या सेवक श्रेणीचें आकर्षण अलीकडे वाटेनासें झालें आहे. राज्य सभेंत ह्या विषयासंबंधीं देण्यांत आलेली माहिती उद्बोधकच म्हटली पाहिजे. ह्या श्रेणीसाठी घेण्यांत येणाऱ्या संयुक्त स्पर्धात्मक परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या १९५७ ते १९५९ पर्यंत वाढत होती. पण त्यानंतर मात्र उमेदवारांची संख्या रोडावत चालली आहे. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोला-वण्यांत आलें अशांची संख्या १९५८ सालीं थोडी कमी झाली. पण पुढील तीन वर्षांत ती पुन्हां वाढली. १९६२ मध्यें ही संख्या पुन्हां कमी झाली आहे. उमेदवारांच्या केवळ संख्येंतच घट झाली आहे असें नाहीं. ती तर झालीच आहे, पण विद्यालयीन शिक्षणांत पहिल्या वर्गांत येणारे विद्यार्थीहि ह्या सेवकश्रेणीच्या परीक्षेला कमी प्रमाणांत बसूं लागले आहेत. ह्याचा अर्थ असा कीं, संख्येच्या दृष्टीनें व गुणी विद्यार्थ्यांना आकर्षण वाटण्याच्या दृष्टीनेंहि, ही श्रेणी अयशस्वी ठरत चालली आहे. हिंदमध्यें ब्रिटिश राजवट असतांना आय. सी. एस. नोकरांना जो दर्जा व प्रतिष्ठा लाभली होती ती आय. ए. एस. सेवकश्रेणीला कधींच लाभली नाहीं. तरीसुद्धां स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या दशकांत पुष्कळ बुद्धिमान् तरुण श्रेणीकडे आकर्षित झाले. अलीकडे दिसून येत असलेल्या ओहोटीचें कारण काय असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. एक कारण असें सांगतां येईल कीं, गेल्या कांहीं वर्षांत खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांतील वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्या मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या आहेत. ह्या नोकऱ्यांत चटकन होणारी भरभराट तरुणांना भुरळ पाडते ह्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. राहणीचा दर्जा वाढविण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना तरुणांनीं दिलेला हा सादच म्हणावयाचा :

## चौथा पंचवार्षिक कार्यक्रम आणि करवाढ

नियोजन समितीचे एक सभासद् डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव कलकत्ता येथील मर्चंटस चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेपुढें 'चालू आर्थिक परिस्थिती'वर बोलतांना म्हणाले, कीं चौथा पंच-वार्षिक कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी २५०० कोटी ते ३,००० कोटी रुपयांची तूट भासण्याची शक्यता आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कर वाढविण्याची जरूरी लागणार नाहीं. परंतु तसें होण्यासाठी कर चुकविण्याचे प्रकार आणि बिनहिशेबी म्हणून दडलेला पैसा ह्या दोन प्रश्नांची सोडवणूक झाली पाहिजे. सध्या मात्र वेगळे चित्र दिसत आहे. कर चुक-विण्याचे प्रकार आणि पैसा दडविण्याची प्रवृत्ति दोन्हीहि वाढत चाललेलीं आहेत. खरेदी–विक्रीच्या व्यवहारांत चेकसनें पैसे देण्याच्या ऐवजीं रोख पैसा देण्याची प्रथा पडत चालली आहे. कारण, रोख दिलेल्या पैशाचा मागोवा घेणें नेहमींच कठीण जातें. वाढत्या किंमतींना आळा घालण्याचें कार्य तुटीचीं अंदाजपत्रकें तयार करण्याचें बंद केल्यानेंच केवळ होईल असें नाहीं कारण पतीवरील व्यवहाराला उत्तेजन देणे हा तुटीच्या अर्थकारणाचाच एक भाग आहे. व्यवहारांतील चलनी नोटा वाढविण्यासारखाच हाहि प्रकार आहे. किंमतीची पातळी स्थिर ठेवण्यासाठी वाढतें उत्पादन आणि नियंत्रित वितरण ह्यांची जरूरी आहे. हिंदमधील शेतीच्या उत्पादनांतील चढउताराचा चक्रनेमिक्रम पाहतां चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीच्या उत्पादनाचें भवितव्य उज्ज्वल राहील असें वाटतें. सुमारें ६ वर्षांच्या काळांत अन्न धान्याचें उत्पादन २ कोटी टनांनीं वाढविता येणें शक्य आहे. चालू आर्थिक परिस्थिति अस्वस्थता उत्पन्न करणारी आहे. परंतु चुकीच्या मार्गानें न गेल्यास ती तशीच राहील असें नाहीं.

---

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची सहकारी उद्योगांना मदत

२० जून, १९६४ अखेर इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशननें एकूण ५५ सहकारी उद्योगांना आर्थिक साहाय्य केलें आहे. त्या-पैकी ५१ सहकारी साखर कारखाने असून ३ सहकारी स्पिनिंग मिल्स आणि १ सहकारी तेल गाळण्याची गिरणी आहे. मंजूर साहाय्याची एकूण रक्कम ३७८५·९२ लक्ष रु. आहे. कॉर्पोरेशननें मंजूर केलेल्या एकूण साहाय्यापैकी सहकारी उपक्रमांच्या वांट्याला १९% कर्जे आलीं आहेत. त्यांचा तपशील असा—

| राज्य | साखर कारखाने | स्पिनिंग मिल्स | तेल गिरण्या | एकूण मंजुरी (लक्ष रु.) |
|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ५ | — | — | ४३५·०० |
| आसाम | १ | — | — | ६०·०० |
| बिहार | — | १ | — | २४·७० |
| गुजरात | ३ | — | — | १४२·५० |
| केरळ | २ | — | — | १८०·०० |
| मद्रास | ६ | — | — | ४४३·०० |
| महाराष्ट्र | २० | १ | — | १४६७·०० |
| म्हैसूर | ४ | — | १ | २९५·२५ |
| ओरिसा | १ | — | — | ८५·०० |
| पंजाब | ५ | — | — | ३३१·०० |
| उत्तर प्रदेश | ४ | १ | — | ३२२·१७ |
| एकूण | ५१ | ३ | १ | ३७८५·९२ |

## अर्थ–योग

तस्मान्नित्योत्थितो राजा कुर्यादर्थानुशासनम् ।
अर्थस्यमूलमुत्थानमनर्थस्य विपर्ययः ॥
अनुत्थाने ध्रुवो नाशः प्राप्तस्यानागतस्यच ।
प्राप्यते फलमुत्थानाल्लभते चार्थसंपदम् ॥

—कौटिलीय अर्थशास्त्र

[ म्हणून, राजानें ( समाजानें ) नित्य उद्योग करून अर्थसाधन करावें. उद्योग हा अर्थप्राप्तीचें मूळ आहे; उलट, उद्योगाचा अभाव अनर्थास कारणीभूत होतो. हातून उद्योग न झाल्यास जवळ असलेल्या व पुढें मिळावयाच्या संपत्तीचा नाश निश्चित आहे. उद्योगानें फलप्राप्ति होऊन भरपूर संपत्ति मिळते. ]

— "अर्था"च्या पहिल्या अंकांतील अग्रलेखाचें शीर्षक.

## अर्थाचें ३१ व्या वर्षांत पदार्पण

शेती, उद्योगधंदे व व्यापार, ह्या अर्थार्जनाच्या योग्य संघटनेवर व कार्यक्षमतेवर समाजाची सुस्थिति अवलंबून आहे, ह्याकरिता जनतेस योग्य शिक्षण मिळून सर्वांच्या अंगीं कार्यक्षमता निर्माण झाली पाहिजे, ह्या उद्देशानें प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं २ जानेवारी, १९३५ रोजीं "अर्था"ची स्थापना केली. तेव्हांपासून गेलीं ३० वर्षे "अर्थ" वक्तशीर प्रसिद्ध होत आहे. "अर्था"च्या कार्याचें राष्ट्रीय महत्त्व ओळखून त्याचे हितचिंतक त्याला उत्साहपूर्वक साहाय्य करीत आले आहेत. त्या सर्वांचे आम्हीं अत्यंत ऋणी आहों "अर्था"च्या सर्व हितचिंतकांना नवें वर्ष सुखाचें व उत्कर्षाचें जावो.

—संपादक

### पूरक अन्नपदार्थांच्या प्रचाराची मोहीम

भारत सरकारच्या अन्नखात्यानें पूरक अन्नपदार्थ लोकप्रिय करण्यासाठी एक मंडळ स्थापन केलें आहे. हें मंडळ पूरक अन्नपदार्थांच्या उपयुक्ततेसंबंधींचा प्रचार लवकरच सुरू करणार आहे. मंडळ आपल्या प्रचारांत आहाराच्या संवयी बदलण्याची आवश्यकता, सकस आहाराविषयीं शास्त्रीय माहिती, अन्न शिजविण्याच्या योग्य पद्धति, अन्नपदार्थ टिकविण्याचे उपाय, इत्यादि मुद्द्यांवर विशेष जोर देईल. प्रचार करण्यासाठी ५ फिरत्या मोटारी सध्यां वापरण्यांत येणार आहेत. लवकरच त्यांत आणखी ११ फिरत्या गाड्यांची भर घालण्यांत येईल. अशा प्रकारचीं ५२ फिरती प्रचार केंद्रें स्थापन करण्याचा मंडळाचा इरादा आहे. ह्या कामीं स्वेच्छेनें काम करणाऱ्या सामाजिक आणि इतर बिगरसरकारी संघटनांचें साहाहि घेण्यांत येईल.

---

### खाणी एंजिनिअरांच्या बेकारीचें स्वरूप

एकीकडे खाणींवर काम करणाऱ्या मॅनेजर्सचा तुटवडा असतांना खाणी एंजिनिअर्स बेकार असलेले आढळून येत होते. ह्या विलक्षण परिस्थितीचा अभ्यास करून तीवर उपाय सुचविण्यासाठी गेल्या ऑक्टोबरमध्यें एक अभ्यासगट नेमण्यांत आला होता. खाणीएंजिनिअर्सच्या शिक्षणाच्या सोयी आणि त्यांना खुल्या असणाऱ्या नोकरीच्या संधि ह्यांत समतोलपणा राखण्याची सूचना गटानें केली आहे. ज्या खाणी एंजिनिअर्सना खाणी चालविण्याच्या पात्रतेसंबंधीं पहिल्या वर्गाचे दाखले होते त्यांच्यांत फारशी बेकारी नसल्याचें गटाला आढळून आलें. दुसऱ्या वर्गाचे दाखले असणारे ४९ खाणी एंजिनिअर्स मात्र बेकार आढळून आले. तथापि, सरकारी खात्यांत त्यांच्या योग्य अशा ५८ जागा होत्या.

---

### तांदळाची टंचाई वन्य हत्तींच्या पथ्यावर

केरळ राज्यांत जानेवारीपासून मार्चपर्यंत वन्य हत्तींना पकडण्याची मोहीम सुरू होते. परंतु १९६५ सालीं ही मोहीम पुढें ढकलण्यांत आली आहे. कारण राज्यांत तांदळाची टंचाई आहे. राज्यांतील अरण्यांत भटकत असलेला १०० हत्तींचा एक कळप आहे. त्यांना पकडलें तर त्यांची भूक कशी भागवावी असा प्रश्न राज्याच्या जंगल अधिकाऱ्यांना पडला आहे. प्रत्येक हत्तीला निदान १० किलोग्रॅम तांदूळ तरी रोज लागतो. केरळमधील देवस्थानेंहि हत्ती पाळीत असतात. त्यांनाहि तांदळाची टंचाई भेडसावीत आहे. केरळ राज्याचें जंगलखातें दरसाल सुमारें २० ते ३० जंगली हत्ती पकडतें आणि त्यांची विक्री करतें. हत्तींच्या विक्रीमुळें राज्याला दरसाल १ लाख रुपयांपेक्षाहि अधिक फायदा होतो. हत्तींना रगी डाळ देण्याचे प्रयत्न होत आहेत.

---

### मॅनेजिंग एजन्सीच्या पद्धतीचें भवितव्य

व्यापारी कंपन्या चालविण्याच्या मॅनेजिंग एजन्सी पद्धतीविषयीं माहिती गोळा करण्यासाठी भारत सरकार लवकरच एक कमिटी स्थापन करणार आहे. मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें चालणाऱ्या कामकाजाबद्दल कमिटीनें अहवाल सादर करावयाचा आहे. अहवालांतील माहितीचा आधार घेऊन ही पद्धत १५ ऑगस्ट १९६५ नंतर चालू ठेवावयाची कीं नाहीं ह्यासंबंधीं निर्णय घेण्यांत येणार आहे. भारतांत एकूण १४५५ मॅनेजिंग एजन्सीज असून त्यांपैकी बहुतेकांची मुदत येत्या ऑगस्टअखेर संपत आहे. कंपनी कायदा कारभार संघटनेच्या १९६३–६४ सालच्या अहवालाप्रमाणें ही पद्धत हळूहळू लोप पावत चालली आहे. ह्या वर्षांत एकूण १२२७ नव्या कंपन्या नोंदण्यांत आल्या. परंतु त्यांपैकीं फक्त २० कंपन्यांनीं कारभार हाकण्यासाठी मॅनेजिंग एजन्सी पद्धत स्वीकारली.

---

### परदेशांत स्थायिक होण्याचें आकर्षण

जपानमधील लोकांना परदेशांत स्थायिक होण्याचें आकर्षण कितपत आहे हें पाहण्यासाठी टोकिओमधील एका वृत्तपत्रानें पाहणी केली. ह्या पाहणीवरून असें दिसून आलें कीं, फक्त ५२ टक्के जपानी लोकांना जपानमध्येंच राहावयाचें आहे. ३१ टक्के लोकांना परदेशांत स्थलांतर करून तिकडेच राहण्याची ओढ आहे. ज्या लोकांना उच्च शिक्षणाचा लाभ झालेला आहे त्यांना युरोपमध्यें घरदार करून राहण्याची इच्छा आहे. त्यांतल्या त्यांत कमी शिकलेले लोक अमेरिकेंत वास्तव्य करण्याचीं स्वप्नें पाहात असतात. देशाबाहेर जाऊं इच्छिणाऱ्या लोकांपैकी फक्त ३ टक्के लोक आशियांतील कोणत्यातरी देशांत जाऊं इच्छितात. एक टक्का लोकांना ऑस्ट्रेलिआ अगर न्यूझीलंड ह्या देशांचें आकर्षण वाटतें.

---

**प्राचीन शिलालेखांचा शोध**—रशिआंतील पुराणवस्तु-संशोधकांना उझबेकिस्तानांतील एका प्राचीन बौद्धमठांत कांहीं संस्कृत शिलालेख आढळून आले आहेत. हा मठ अमुदर्या नदीच्या कांठीं खडकांत खोदलेला असून तो सुमारें १,६०० वर्षांपूर्वींचा असावा. मठांत बुद्धाच्या भंगलेल्या पुतळ्याचे कांहीं भागहि सांपडले आहेत. संस्कृत शिलालेखाचा रशिआंत लागलेला हा पहिलाच शोध आहे.

**अणुबॉंबची निर्मिति घातक**—रेल्वेमंत्री श्री. स. का. पाटील, मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं, भारतानें अणुबॉंबची निर्मिति केल्यास चीनला थोडीबहुत धास्ती उत्पन्न होईल हें खरें; पण अणुबॉंबच्या निर्मितीमुळें त्याचा स्फोट होण्यापूर्वींच त्यासाठी होणाऱ्या खर्चामुळें भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होऊन जाईल. भारत अणुशक्तीबाबत इतर देशांच्या फारसा मागें नाहीं.

**उमर खय्यामच्या जीवनावर चित्रपट**—उमर खय्याम या प्रख्यात कवीच्या जीवनावर चित्रपट काढण्यांत येणार आहे. या कामीं संयुक्त अरब प्रजासत्ताक आणि भारत या देशांतील निर्माते सहकार्य करणार आहेत. भारतातर्फे श्री. बिमल रॉय यांची मदत घेण्यांत येण्याचा संभव आहे. मद्य आणि संगीत यांचा व मानवी जीवनाचा मुक्त भोक्ता म्हणून हा जुना कवि जगभर प्रसिद्धि पावलेला आहे.

**दक्षिण भारतांमधील पोलादाचा कारखाना**—दक्षिण भारतांत स्थापन करण्यांत यावयाचा भारतामधील पांचवा पोलाद-कारखाना कोठें काढावयाचा ते अद्याप ठरलेलें नाहीं. ज्या देशातर्फे कारखान्यासाठी लागणारे परदेशीय चलन व तांत्रिक ज्ञान उपलब्ध होईल त्यावर कारखान्याची जागा अवलंबून आहे. सालेम, विशाखापट्टम् आणि गोवा या ठिकाणांचीं नांवें कारखान्यासाठी सुचविण्यांत आलेलीं आहेत.



राष्ट्र संरक्षणाला मदत व्हावी या सदिच्छेनें तुम्हीं पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेत किंवा संरक्षण बचत सर्टिफिकिटांत पैसे गुंतविले आहेत का? मग ते मुदत भरली तरी परत काढूं नका. कारण त्यामुळेंच संरक्षण प्रयत्नांना खरी मदत होणार आहे.

राष्ट्र संरक्षणाच्या दृष्टीनें शक्य तितकी बचत
वाढविणें हें जसें आजघडीचें एक राष्ट्र कर्तव्य आहे
तसेंच गुंतविलेले पैसे परत न काढणें
हेंहि या आणिबाणीच्या क्षणीं एक राष्ट्रकर्तव्यच आहे
कारण

SMALL SAVINGS SAVE THE STATE & YOUR FAMILY

भारताच्या संरक्षणासाठी
**तुमच्या बचतीच्या प्रत्येक रुपयाची आज आवश्यकता आहे**

अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन, सचिवालय, मुंबई ३२

# संचित मुदतीच्या ठेवींची योजना

संचित मुदतीच्या ठेवींची योजना म्हणजे तुमची बचत गुंतविण्याचा एक सोपा आणि सुलभ मार्ग. तुमचें स्वतःचें घर, तुमच्या मुलांचें शिक्षण, निवृत्तीनंतर सुखासमाधानाचें आयुष्य, अशा कितीतरी गोष्टी तुम्हांला या बचतीमुळें साध्य करून घेतां येतील. या योजनेच्या ५, १० किंवा १५ वर्षांच्या खात्यांत दरमहा ५, १०, २०, ५०, १००, २०० आणि ३०० रुपयांचे मासिक हप्ते पोस्टांत भरण्याची सोय आहे. ५, १० किंवा १५ वर्षांनीं हे हप्ते तुम्हांला एका भरघोस रकमेनें सव्याज परत मिळतात.

### भरघोस रकमेची परतफेड

| मासिक हप्त्याची रकम | मुदतीअंतीं मिळणारी रकम | | |
|---|---|---|---|
| | ५ वर्षे | १० वर्षे | १५ वर्षे |
| रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| ५ | ३२५ | ७२५ | १,२५० |
| १० | ६५० | १,४५० | २,५०० |
| २० | १,३०० | २,९०० | ५,००० |
| ५० | ३,२५० | ७,२५० | १२,५०० |
| १०० | ६,५०० | १४,५०० | २५,००० |
| २०० | १३,००० | २९,००० | ५०,००० |
| ३०० | ... | ... | ७५,००० |

३०० रुपयांचे मासिक हप्ते फक्त १५ वर्षे मुदतीच्या खात्यांतच भरतां येतात. मुदतीअंतीं पुढीलप्रमाणें व्याज मिळतें— ५ वर्षांच्या खात्यांत ३·४ टक्के दराचें सरळ व्याज (३·२ टक्के दराचें चक्रवाढ व्याज); १० वर्षांच्या खात्यांत ४·१ टक्के दराचें सरळ व्याज (३·८ टक्के दराचें चक्रवाढ व्याज) आणि १५ वर्षांच्या खात्यांत ५·२ टक्के दराचें सरळ व्याज (४·३ टक्के दराचें चक्रवाढ व्याज). प्राप्तिकर भरणाऱ्या खातेदाराला त्याच्या मासिक हप्त्यावरील प्राप्तिकरांत सूट मिळते.

पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेचा व्यवहार करणाऱ्या कुठल्याहि पोस्ट ऑफिसांत हें खातें प्रौढ व्यक्तीला किंवा दोन प्रौढ व्यक्तींना संयुक्तपणें उघडतां येतें. त्याचप्रमाणें अल्पवयीन व्यक्तीस आपल्या नांवावर खातें उघडतां येतें किंवा प्रौढ व्यक्तीला त्याच्या नांवें खातें उघडतां आणि चालवितां येतें.

### मासिक हप्ते

कॅलेंडर महिन्यांत कधींहि हप्ते भरतां येतात. खातें उघडण्यासाठीं किंवा मासिक हप्ते भरण्यासाठीं चेकहि स्वीकारण्यांत येतात. एका पोस्ट ऑफिसांतून त्याच किंवा दुसऱ्या गांवांतील पोस्ट ऑफिसामध्यें खातें बदलून घ्यावयाचें असल्यास तसें कधींहि करतां येतें.

तुमच्या पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेतील खात्यांत पुरेशी रकम असेपर्यंत त्यांतून दरमहा संचित मुदतीच्या ठेवींचे हप्ते भरण्याची व्यवस्था तुम्ही पोस्ट ऑफिसच्याद्वारें करूं शकतां. अशा बाबतींत पासबुकांत आवश्यक तीं नोंद करण्यासाठी ठेवीदारानें पासबुक तीन महिन्यांतून निदान एकदां तरी पोस्ट ऑफिसांत सादर करावें अशा त्यांस सल्ला देण्यांत येत आहे.

### पैसे काढण्याची सोय

खात्यामध्यें भरलेल्या रकमेच्या जास्तींत जास्त ५० टक्के रकम १० रु. च्या पटींत ५ वर्षांच्या खात्यांमधून एकदां, दहा वर्षांच्या खात्यांमधून दोनदां आणि १५ वर्षांच्या खात्यांमधून तीनदां परत काढतां येतें. मात्र खात्याला निदान एक वर्ष पुरें झालें असलें पाहिजे. १० आणि १५ वर्षांच्या खात्याच्या बाबतींत खातें चालू झाल्यानंतर अनुक्रमें ५ आणि १० वर्षांनंतर दुसऱ्यांदां आणि तिसऱ्यांदां अशा रीतीनें रकम परत काढतां येतें.

ही परत काढलेली रकम ६ टक्के दराच्या सरळव्याजासह खातेदाराला खात्यांमधून मिळावयाच्या रकमेमधून कापून घेण्यांत येते. त्याचप्रमाणें परत काढलेली रकम खात्याची मुदत संपण्याआधीं कधींहि एका रकमेनें पुन्हां जमा करतां येतें. अशा बाबतींत पैसे परत भरीपर्यंतच्या काळाचें ६ टक्के दरानें सरळ व्याज भरावें लागतें.

### वारस नेमण्याची तरतूद

खात्याची मुदत संपण्यापूर्वी ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास खात्यांतील रकम घेण्यासाठी वारस नेमण्याची सोय आहे. वारस अल्पवयीन असल्यास त्याच्या वतीनें पैसे घेण्यासाठी ठेवीदाराला पालकाचीहि नेमणूक करतां येते.

ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास नियुक्त इसमास किंवा वारसास खात्याची मुदत संपेपर्यंत हप्ते भरून खातें चालू ठेवतां येतें, किंवा 'पेड-अप्' करतां येतें, किंवा कॅश सरेंडर व्हॅल्यूहि घेतां येते. ही कॅश सरेंडर व्हॅल्यू जमा झालेल्या हप्त्याच्या रकमेपेक्षा कमी असणार नाहीं.

### प्राप्तिकरांत सवलत

आयुर्विम्याचे हप्ते आणि अधिकृत प्रॉव्हिडंट फंडाचे हप्ते यांच्या बाबतींत ज्याप्रमाणें प्राप्तिकरांत सूट मिळते. त्याचप्रमाणें १९६२–६३ च्या आर्थिक वर्षापासून १० आणि १५ वर्षे मुदतीच्या संचित मुदतीच्या खात्यांतील हप्त्यांवरहि प्राप्तिकरांत सवलत मिळते. ही सवलत, प्राप्तिकर कायद्यांतील तरतुदीप्रमाणें १०,००० रु. ची कमाल मर्यादा किंवा वार्षिक उत्पन्नाच्या १/४ यांपैकी जी रकम कमी असेल तिच्यावर मिळते.

---

## बचत योजनेसाठी स्वयंसेवक

★ आपल्या देशावर आलेल्या या संकटकाळांत देशाच्या उपयोगी पडावें अशी आपली मनापासूनची इच्छा आहे ना ?

★ तर मग तुम्ही बचत योजनेचे स्वयंसेवक किंवा अधिकृत एजंट व्हा.

★ देशसंरक्षणासाठी बचत ही निकडीची आवश्यकता आहे. लोकांची बचत करण्याची इच्छा आहे. तेव्हां त्यांना नियमितपणें बचत करण्याच्या बाबतींत मदत करा.

★ लक्षांत ठेवा, ही आणीबाणीची वेळ आहे. तेव्हां त्वरा करा.

★ जिल्हाधिकाऱ्यांकडे किंवा तुमच्या जिल्ह्याच्या राष्ट्रीय बचत जिल्हा संघटकाकडे अर्ज करा.

---

**वृत्तपत्रें टाकणाऱ्या मुलांच्या आरोग्यासाठीं**—जपानमधील तीन राष्ट्रीय वृत्तपत्रांपैकी दोन वृत्तपत्रांच्या चालकांनीं दरमहा येणाऱ्या पहिल्या व तिसऱ्या रविवारीं संध्याकाळच्या आवृत्त्या काढावयाच्या नाहींत असा निर्णय घेतला आहे. वृत्तपत्रांचें वांटप करणाऱ्या मुलांची आबाळ थांबवावी आणि त्यांचें आरोग्य सुधारावें ह्यासाठीं हा उपक्रम योजण्यांत आला आहे.

# सर्टिफिकिटें तारण ठेवण्याची सोय

मध्यवर्ती सरकारनें १९४५ च्या पोस्ट ऑफिस राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटविषयक नियमांत दुरुस्ती केली असून, या दुरुस्तीनुसार आतां तात्पुरतीं कर्जें मिळविण्यासाठीं, राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटें तारण ठेवतां येण्याची सवलत देण्यांत आली आहे. तेव्हां एखाद्या बचतदाराला मुदत भरण्याअगोदरच जर पैशांची गरज लागली तर त्याला हीं सर्टिफिकिटें तारण ठेवून त्यांवर तात्पुरतें कर्ज मिळवितां येईल. शिवाय सर्टिफिकिटांच्या मुदतीअंतीं त्याला द. साल द. शेंकडा ५·४१ रु. चें सार्धे व्याजहि मिळेल.

### सर्टिफिकिटें कोठें तारण ठेवतां येतील ?

बचतदाराला तात्पुरतें कर्ज मिळविण्यासाठीं आपलीं सर्टिफिकिटें तारण म्हणून पुढें दिलेल्या संस्थांच्या नांवें करून देतां येतील.

(१) रिझर्व बँक ऑफ इंडिया.

(२) १९३४ च्या रिझर्व बँक ऑफ इंडिया कायद्यांत नमूद केलेल्या वर्गीकृत बँका.

(३) कार्पोरेशन बँका आणि १९१२ च्या सहकारी संस्था-संबंधींच्या कायद्यानुसार किंवा राज्यांत प्रचलित असलेल्या तशाच प्रकारच्या कायद्यानुसार नोंदविलेल्या संस्था.

(४) ज्या संस्थेचे निम्मे किंवा त्याहून अधिक शेअर सरकारनें विकत घेतले असतील अशा संस्था. उदा—कार्पोरेशनें, लिमिटेड कंपन्या आणि नोंदविलेल्या फर्म्स.

या संस्थांकडे सर्टिफिकिटें तारण ठेवून बचतदाराला तात्पुरतें कर्ज मिळवितां येईल. या सवलतीसंबंधींची माहिती सर्व वर्गीकृत बँकांना आणि सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारना देण्यांत आली असून, त्यांच्यामार्फत ती सर्व सहकारी संस्थांनाहि कळविण्यांत आली आहे.

### बचतदारानें काय केलें पाहिजे ?

ज्या बचतदाराला तात्पुरतें कर्ज मिळविण्यासाठीं अशा रीतीनें सर्टिफिकिटें तारण ठेवावयाचीं असतील त्यानें संबंधित वर्गीकृत बँक, सहकारी संस्था अथवा जी अन्य संस्था सर्टिफिकिटांचें तारण स्वीकारावयास तयार असेल त्या संस्थेचें तशा आशयाचें सम्मतिपत्र मिळवावें आणि नंतर सर्टिफिकिटें दुसऱ्याच्या नांवें करून देण्याबाबतचा पोस्टांत मिळणारा फॉर्म घेऊन तो योग्य तऱ्हेनें भरावा व सवरहू भरलेला फॉर्म, सम्मतिपत्र आणि तारण ठेवावयाचीं सर्टिफिकिटें पोस्टांत दाखल करावीं.

ही गोष्ट झाल्यावर संबंधित संस्थेकडून कर्ज काढण्याकरतां बचतदाराला सर्टिफिकिटें तारण म्हणून ठेवतां येतात. तारणाची किंमत (अ) ज्या किंमतीला सर्टिफिकिटें विकत घेतलीं असतील तेवढी किंवा (ब) व्याज जमा झालें असेल त्या दिवशीं होणारी त्यांची सरेंडर व्हॅल्यू; इतकी समजण्यांत येईल.

### सर्टिफिकेट परत मिळेल

ज्या संस्थेकडून कर्ज घेतलें असेल ती संस्था कर्जाची परतफेड झाल्यानंतर सर्टिफिकिटें परत करील व त्याची मालकी पुन्हां सर्टिफिकीट ज्यानें प्रथम घेतलें असेल त्याच्याकडे जाईल. जेव्हां सर्टिफिकीट परत करावयाचें असेल तेव्हां संबंधित संस्था तशा प्रकारचें लेखी शिफारसपत्र सर्टिफिकीट धारण करणाऱ्याला देईल व त्याप्रमाणें तें सर्टिफिकीट परत करील. हें सर्टिफिकीट व शिफारसपत्र पोस्ट ऑफिसमध्यें दाखवून, बचतदाराला तें परत आपल्या नांवावर करून घेतां येईल; अशा तऱ्हेनें आपलें सर्टिफिकीट त्याला परत मिळेल. जर सर्टिफिकीट धारण करणारानें हें कर्ज फेडलें नाहीं तर ज्या संस्थेत किंवा बँकेत सर्टिफिकीट तारण म्हणून ठेवलें असेल ती संस्था किंवा बँक नियमानुसार त्या सर्टिफिकिटावर पैसे काढूं शकते.

ही पद्धत अतिशय सोपी आहे आणि गरजू इसमाला त्यामुळें सर्टिफिकिटांच्या तारणावर आपल्या तात्पुरत्या अडचणींतून स्वतःची सोडवणूक करून घेतां येते.

---


### ग्रामीण कर्जरोखे

★ ग्रामीण कर्जरोखे भू–विकास बँकेनें विक्रीसाठीं काढले असून त्याला महाराष्ट्र सरकारची हमी आहे.

★ हे कर्जरोखे १०० रु., ५०० रु., १००० रु., ५००० रु. आणि १०,००० रुपयांच्या दर्शनी किंमतींत भू–विकास बँकेच्या शाखांतून विकत मिळूं शकतात.

★ या कर्जरोख्यावर ५½ टक्के दराचें व्याज दरवर्षी दिलें जातें. कर्जरोख्याची मूळ रक्कम ७ वर्षांनंतर परत मिळते.

★ ग्रामीण कर्जरोख्यांतून शेतकऱ्यांस शेतीच्या विकासाकरितां, विहिरीकरितां आणि पंप बसविण्याकरितां कर्जे देण्यांत येतें.

शेतीच्या विकासासाठीं आजच कर्जरोखा खरेदी करा.


---

### बीर दारूचें वाढतें उत्पादन

### कारण ? पिणारे वाढले !

१९६१ सालीं भारतांत ८८७ किलोलिटर्स बीर दारूचें उत्पादन झालें होतें. १९६२ मध्यें तें ९५६ किलोलिटर्स भरलें. १९६३ मध्यें उत्पादनांत आणखी खूपच वाढ झाली; १९६४ मध्यें तर त्यांत सपाटून भर पडली. १९६४ मधील बीरचें उत्पादन २०,००० किलोलिटर्स झालें असावें. १९६४ च्या पहिल्या तीन महिन्यांतच ५,००० किलोलिटर्स बीर तयार करण्यांत आली होती. हिंदी बीरचा दर्जा आतां खूपच सुधारला आहे; कित्येक आशियाई व आफ्रिकी देशांच्या बीरपेक्षा हिंदी बीर निःसंशय चांगली आहे. तेव्हां तिच्या निर्गतीची शक्यता निर्माण झाली आहे. बीर पिणारांची संख्या भारतांत वाढत आहे, हें वरील आंकड्यांवरून सिद्ध होतें.

---


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड, कोल्हापूर

## चेअरमन श्री. रामनिवास रामनारायण रुईया यांचें एकतिसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेंतील भाषणाचा गोषवारा

( फक्त सभासदांकरितां )

सद्गृहस्थहो,

सभेच्या कामाला सुरुवात करण्यापूर्वी आपले प्रिय पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अत्यंत शोचनीय निधनामुळें आपणांवर दुर्दैवाचा जो घोर आघात झाला आहे त्याचा उल्लेख करणें हें माझें दुःखद कर्तव्य आहे. ते आधुनिक भारताचे भाग्य-विधाते होते. स्वातंत्र्यपूर्व लढ्यांतील आघाडीचे सेनानी होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत पूर्व–पश्चिमेचा अपूर्व संगम झालेला होता. गेल्या सतरा वर्षांच्या काळांत आपल्या चैतन्यशील व्यक्तित्वानें आणि दूरदर्शी धोरणामुळें त्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासाचा विस्तृत पाया घातला. त्यांचें शांततेचें व अलिप्ततेचें धोरण जगाला दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शक ठरलें होतें. आपल्या या प्रिय दिवंगत नेत्याच्या स्मृतीला आदरांजलि वाहण्यासाठी दोन मिनिटें उभें राहून स्तब्धता पाळण्याची मी विनंती करतों.

तसेंच, कारखान्याचे डेप्युटी जनरल मॅनेजर व चीफ केमिस्ट श्री. एस. डी. पाटील, यांच्या शोचनीय निधनाचा उल्लेख करतांनाहि मला दुःख होत आहे. कारखान्याशीं ते सुरुवातीपासून निगडीत होते. साखरधंद्याच्या विविध शास्त्रांत प्रावीण्य मिळविलेले आपल्या देशांत जे फारच थोडे शुगर टेक्नॉलॉजिस्टस आहेत, त्यांत त्यांची गणना होत असे. कंपनीशीं असलेली त्यांची एकरूपता केवळ अद्वितीय होती. त्यांच्या निधनानें झालेली हानि भरून येणार नाहीं असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

दिनांक ३० जून १९६४ इसवीअखेरचीं नफा–तोटा व ताळेबंद पत्रकें आपल्या हातीं आधींच आलीं आहेत. तीं आपण वाचलीं असतीलच.

अहवालाच्या सालीं साखरेचें उत्पादन ३,२९,२८० क्विंटल झालें व साखरेचा सरासरी उतारा १२·००६ पडला. मागील सालीं हे आंकडे अनुक्रमें ३,८०,२३१ क्विंटल व १२·४७ असे होते. शेतकऱ्यांनीं गुळासाठी ऊंस मोठ्या प्रमाणांत वापरल्यामुळें सर्व देशांतच आणि आपल्याकडेहि त्या मानानें साखर उत्पादन कमी झालें. गेल्या वर्षीं गाठलेली २५००–२६०० मेट्रिक टन ही गाळप शक्ति मात्र कायम राहिली.

अहवालाच्या सालीं डिस्टिलरीची जुनी व नवी प्लँट्स समाधानकारकपणें चालून ६१,३०,०६५.४ लिटर उत्पादनाचा उच्चांक गांठण्यांत आला. पंचगंगा, वारणा, भोगावती, दूधगंगा, वेदगंगा या शेजारच्या सहकारी कारखान्यांची मळी वापरण्यांत आली. या कारखान्यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.

देशांतील अल्कोहोल उत्पादनाची परिस्थिति एकंदर तुटीची आहे. आपल्या डिस्टिलरीची उत्पादनक्षमता रोजी २१·८ किलोलिटर आहे. आणि वर्षाला ९,०९० किलोलिटर हें लक्ष्य ती गांठूं शकते. अहवालाच्या सालीं मळीच्या अभावीं डिस्टिलरी ३५·९ इतके दिवस बंद होती. औद्योगिक कारणांसाठी अल्कोहोलचें जास्तींत जास्त उत्पादन व्हावें म्हणून मळीचा भरपूर सांठा महाराष्ट्र सरकारनें उद्योग खात्यामार्फत उपलब्ध करून देणें जरूर आहे. तसेंच रोजची उत्पादनक्षमता वाढवून मिळण्यासाठी आम्ही केलेल्या अर्जास मध्यवर्ती सरकारची मंजुरी येण्याची वाट पाहात आहोंत. सरकारी कामकाजांतील निष्कारण विलंबामुळें धंद्यांत अडचणी निर्माण होतात आणि पर्यायानें देशाच्या औद्योगिक प्रगतींत अडथळे येतात हें नमूद करण्यास खेद होतो.

जमीन धारणा कमाल मर्यादा कायद्याखालीं कंपनीच्या जमिनी सरकारनें ताब्यांत घेतल्या आहेत. शेती यंत्रें व अवजारेंहि घेतलीं जातील असें आश्वासन संयुक्त समितींत देण्यांत आलें होतें तथापि आतां कोणतींहि शेती यंत्रें वा अवजारें सरकारकडून घेतलीं जाणार नाहींत, त्यामुळें कंपनीचें बरेंच भांडवल त्यांत अडकून पडणार आहे. त्याचप्रमाणें ज्या इरिगेशन खात्यांत कंपनीनें मोठी रक्कम गुंतवलेली आहे ती योजना सरकार घेणार नाहीं. उलट कार्पोरेशनच्या पिकांना पाणीपुरवठा करण्यास मात्र आम्हांस सांगण्यांत आलें आहे. विशेष खेदाची गोष्ट म्हणजे पाणीपुरवठ्याचे दर ठरविण्याचा प्रश्नहि तसाच लोंबकळतच राहिला आहे. जॉईंट स्टॉक शुगर कंपन्या, त्या खासगी क्षेत्रांतल्या असल्या तरी, राष्ट्रीय उद्योगधंद्याचाच भाग आहे आणि अशा प्रकारच्या विलंबामुळें व अडचणींनीं उद्योगधंद्याबरोबरच देशाचेंहि नुकसान होतें. अशीच दिरंगाई जमिनी, पाट, विहिरी, वगैरेंबाबत नुकसानभरपाई ठरविण्यासंबंधीं आणि कारखान्याला ऊंसपुरवठा करण्याचे विभाग ठरविण्यासंबंधींहि अनुभवास येत आहे.

उसाची वाहतूक सुकर व कमी खर्चाची व्हावी यासाठी रस्त्यांची सुधारणा करण्याच्या प्रश्नाचा मीं गेल्या वर्षीं उल्लेख केला होता. आतांपर्यंत कंपनीनें केन सेस, परचेस टॅक्स, यांच्या रूपानें एक कोटी रुपयांहून अधिक रक्कम सरकारांत भरलेली आहे. कारखान्याच्या ऊंस पुरवठा क्षेत्रांतील वाहतूक सुधारण्याच्या विशिष्ट कारणासाठीच हे कर बसविण्यांत आले आहेत. याबाबत सरकारनें कांहींहि केलेलें नाहीं. आणि जिल्हा परिषदेकडूनहि थोडेसेंच काम झालें आहे. असें समजतें कीं, रस्ते सुधारण्यासाठी प्रत्येक सहकारी साखर कारखान्यास दोन लक्ष रुपये देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. आपल्या किंवा दुसऱ्या कुठल्याहि जॉईंट स्टॉक कारखान्यास अशी मदत देण्यांत आलेली नाहीं.

कंपनीच्या विकासासाठी आवश्यक असलेलें भांडवल जमविण्याच्या दृष्टीनें नफ्यापैकीं भाग परत धंद्यांत गुंतविण्याचें धोरण मॅनेजमेंटनें सतत कसें अवलंबलें आहे हें गेल्या वर्षीं मी स्पष्ट केलें होतें. दिनांक ३० जून १९६४ इसवीची एकूण भांडवल गुंतवणूक रु. ४,३०,००,००० होती. परंतु दिवसेंदिवस करांचा अवजड बोजा, स्टोअर्स मालाच्या किंमतींतील वाढ, वेतनांतील वाढ आणि आतां त्यांतच नव्यानें सोसावा लागणारा तोडणी वाहतुकीचा खर्च व ऑक्ट्राय कर, यांमुळें भांडवलांत भर टाकणें यापुढें फार कठीण जाईल.

अहवालाच्या सालीं कंपनीची आर्थिक परिस्थिति सर्वसाधारणपणें समाधानकारक आहे. परंतु टॅरिफ बोर्डाची चौकशी होऊन गेल्यानंतरच्या काळांत निरनिराळ्या करांचा बोजा साखरधंद्याला

सोसावा लागला असल्यानें व वेज बोर्डाच्या शिफारशी अमलांत आणाव्या लागल्यानें साखरेच्या उत्पादन खर्चाची नव्यानें चौकशी व्हावी अशी सूचना मीं केली होती. आतां सरकारनें हा प्रश्न हातीं घेण्यास टॅरिफ बोर्डाला सांगितलें आहे हें पाहून समाधान वाटतें. तात्पुरता उपाय म्हणून सरकारनें सेन कमिशनची नेमणूक केली आहे हें आपणांस माहीत आहेच.

देशांतील एकूण ऊसउत्पादनापैकी साखरधंद्यासाठी केवळ २५ ते ३० टक्के ऊस वापरला जातो. बाकीचा गूळ व खांडसरीसाठी जातो. गुळाचें उत्पादन करमुक्त असल्यामुळें फायद्याच्या दृष्टीनें गूळ करण्याकडे प्रवृत्ति वाढूं लागली आहे. विशेषत: गेल्या वर्षापासून ही स्पर्धा साखरधंद्याला तीव्रतेनें जाणवूं लागली आहे. परिणामीं, १९६३–६४ चें साखरउत्पादनाचें लक्ष्य ३३,००,००० मेट्रिक टन असतांना, उसाचें पीक बरेंच चांगलें असूनहि, प्रत्यक्ष उत्पादन मात्र २५·७५ लक्ष मेट्रिक टनदेखील झालें नाहीं. सुधारत्या राहणीमानाबरोबरच साखरेचा देशांतील खपहि वाढत्या प्रमाणांत आहे आणि या बाबतचे अंदाज चुकीचे ठरले आहेत. शिवाय निर्यातीची जबाबदारी तर आहेच. त्यामुळें साखर टंचाईच्या बाबतचा गेल्या वर्षाचा माझा अंदाज बरोबर होता हें दिसून येईल. त्यामुळें किंमत व वांटप इत्यादींवरील नियंत्रणें दीर्घकाळपर्यंत राहतील असें दिसतें.

साखरेचा धंदा देशांतील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा धंदा आहे. तथापि त्यापुढील प्रश्नांचा विचार करतांना वाटतें कीं, भरीव, सर्वंकष व वास्तववादी दृष्टिकोण ठेवल्याखेरीज या येवढ्या महत्त्वाच्या धंद्याची कधीं उत्पादनाची विपुलता तर कधीं टंचाई या पेंचप्रसंगांतून सुटका होणार नाहीं.

शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणें जरूर आहे याची मला जाणीव आहे. उसाचें एकरीं उत्पादन वाढविण्याचें धोरण हाच यावर कांहींसा दीर्घकालीन पण तर्कशुद्ध उपाय आहे, असें माझें मत आहे. उसाचें दर एकरीं उत्पादन समाधानकारकपणें वाढेपर्यंत कारखान्याला ऊस घालण्याला शेतकऱ्यांस आकर्षक दर देणें साखर कारखान्याला भाग आहे, आणि भाग राहील. पण कोणत्याहि कच्च्या मालाची किंमत वाढण्याचा परिणाम पक्क्या मालाची म्हणजेच साखरेची किंमत वाढण्यावर होणें स्वाभाविक आहे. याचा अंतिम परिणाम गिऱ्हाइकावर होतोच. मिलला जादा एक्स फील्ड किंमत देतां यावी म्हणून साखर धंद्यांतील प्रमुखांनीं मधला मार्ग म्हणून कांहीं प्रमाणांत साखरेचें विनियंत्रण ( सिलेक्टिव्ह डीकंट्रोल ) सुचविलें होतें, पण सरकारनें तें फेटाळून लावलें.

ऊस-पुरवठ्याबाबत चालू सालांतील परिस्थितीचा मी उल्लेख करूं इच्छितों. जॉइंट स्टॉक शुगर फॅक्टरींना सरकारनें ठरवून दिलेल्या एक्स फॅक्टरी दरांत ऊस मिळविणें कठीण असल्याचें दिसून आलें आहे. किंबहुना उत्तर प्रदेशांत उसाअभावीं कांहीं कारखाने बंद पडले आहेत, गेल्या खेपेस मी आपणांसमोर बोललों तेव्हां सहकारी कारखान्यांनीं उसाला जादा एक्स फील्ड दर देण्याचें ठरविल्यामुळें जॉइंट स्टॉक कारखान्यांनाहि तसें करावें लागेल आणि त्यामुळें उत्पादन खर्चांत वाढ होण्याची शक्यता आहे असा अंदाज व्यक्त केला होता. आपल्या देशानें संमिश्र अर्थव्यवस्थेचा अवलंब केला आहे. या व्यवस्थेंत ऑस्ट्रेलियाप्रमाणें परस्परांच्या हिताच्या दृष्टीनें एकत्र व योजनाबद्ध काम केलें पाहिजे. एकंदर देशाच्या दृष्टीनेंहि हें निश्चित हितावह होईल. विशेषत: महाराष्ट्रांत जॉइंट स्टॉक कारखान्यांच्याप्रमाणें सहकारी कारखान्यांची संख्याहि बरीच आहे. खासगी क्षेत्रांतील कारखाने सार्वजनिक क्षेत्रांतील कारखान्यांच्या मानानें ऊस-पुरवठ्याच्या बाबतींत अधिक अडचणीच्या परिस्थितींत ठेवले जाणार नाहींत हें पाहणें सरकारचें कर्तव्य आहे असें मी ठामपणें म्हणतों.

ऊस किमतीच्या प्रश्नाबाबत बोलावयाचें झाल्यास मध्यवर्ती सरकार उसाच्या किमती एक्स फॅक्टरी ठरवितें. आणि त्या आधारें साखरेची किंमत ठरविण्यांत येते. तर महाराष्ट्र सरकार जॉइंट स्टॉक कारखान्यांच्या बाबतींत सहकारी कारखान्याप्रमाणेंच एक्स फील्ड दर ठरविण्याचा पुरस्कार करते. हें कांहींसें चमत्कारिक वाटतें. तसेंच जॉइंट स्टॉक कारखाने खूप नफा मिळवतात असें म्हणून ते देत असलेल्या एक्स फॅक्टरी दराच्या विरुद्ध आंदोलनें करण्यास मध्यवर्ती सरकारचे कांहीं वरिष्ठ अधिकारी आपल्या मर्यादेबाहेर जाऊन उत्तेजन देतांना दिसतात हें तर विस्मयकारक आहे. खाजगी कारखान्यांच्या नफ्याचा साठ टक्के भाग राष्ट्रीय तिजोरींत जातो हें ते विसरतात. ऊस घालणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनांतील चलबिचल लक्षांत घेऊन मॅनेजिंग एजंट्सनी चालू सालीं तोडणी, वाहतूक व ऑक्ट्राय यांचा जादा बोजा सोसण्याची तयारी दर्शविली आहे. या जादा खर्चाचा अंदाज सध्यां दर मेट्रिक टनाला १० ते ११ रु. धरला आहे. या कारणानें मिलच्या नफ्यावर बराच परिणाम होणार आहे.

गूळ मार्केटची तीव्र स्पर्धा लक्षांत घेतां चालू सालीं मिलच्या उसाचे गाळप २,५५,००० मेट्रिक टनांपर्यंत जाईल असें वाटतें.

उत्तरेकडील कारखान्यांना दिला जातो त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील कारखान्यांनाहि वाहतूक रिबेट मिळाला पाहिजे. महाराष्ट्रांतील वाहतुकीची परिस्थिति, विशेषत: खरेदी केंद्राच्या बाबतींत, उत्तरेपेक्षा अगदीं निराळी आहे. आणि मध्यवर्ती सरकारनें महाराष्ट्रांतील कारखान्यांना तसा वाहतूक रिबेट आतां दिला पाहिजे.

वर्तमानपत्रांतील बातम्या पाहतां शुगर मार्केटिंग बोर्ड स्थापण्याची कल्पना सरकारनें अखेरीस सोडून दिल्याचें दिसतें, ही समाधानाची गोष्ट आहे.

निर्यातीच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत आपल्या देशानें चांगलें स्थान मिळविलें आहे ही समाधानाची बाब आहे. अलीकडेच राष्ट्रकुल करारानुसार ब्रिटनकडून आम्हांला २५,००० मेट्रिक टनांचा कोटा मिळाला आहे आणि अमेरिकेकडूनहि कांहीं मिळेल अशा भरंवसा वाटतो. शेजारच्या आग्नेय देशांशींहि निर्यात चालू राहीलच. अंतर्गत वांटपाच्या बाबतींत टंचाई असतांनाहि देशानें मिळविलेली निर्यातीची बाजारपेठ टिकविली पाहिजे. गेल्या वर्षी परकीय पेठांत साखरेची किंमत जास्त होती. त्यामुळें निर्यातींत विशेष तोटा आला नाहीं. सरकारनेंहि अल्प प्रमाणांत मदत दिली. पण आज परकीय पेठेंत किमतीची पातळी तशी राहिलेली नाहीं. तरीदेखील अत्यंत आवश्यक असलेलें परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यातींतील आपलें स्थान टिकवणें जरूर आहे. निर्यातीचें क्षेत्र वाढविणें व सुधारत्या राहणीमानामुळें अंतर्गत खपाची वाढती मागणी पुरविणें हीं साखरधंद्याच्या विकासाचीं मार्गदर्शक तत्त्वें असावींत. हें साधण्यासाठी साखरेचें उत्पादन शक्य तितक्या कमी खर्चांत झालें पाहिजे.

ॲसिटिक ॲसिडचें उत्पादन सुरू झालें आहे हें सांगण्यास मला समाधान वाटतें. त्याचा दर्जाहि चांगला आहे. तथापि बाजारांतील मंदीमुळें विक्री सुरू नाहीं. ब्युटेनॉल कारखान्याची उभारणीहि लौकरच पुरी होईल. कार्बन डाय ऑक्साइड व ड्राय आईस या कारखान्यांची यंत्रसामग्री मागविण्याबाबत चौकशी सुरू आहे.

ऑइल मिलचें काम समाधानकारकपणें चालू होतें. एकंदर २६४७५२६ मेट्रिक टन शेंगाचें गाळप होऊन ७७६.७५० मेट्रिक टन इतकें तेल व १०८३.७५१ मेट्रिक टन पेंड तयार झाली. आणि हा सर्व माल विकला गेला आहे.

शुगर मिल्स जिमखाना नेहमींप्रमाणेंच चांगल्या प्रकारें चालला आहे. जिमखान्याच्या वतीनें झालेल्या लीग बॅडमिंटन सामन्यांत आपले खेळाडू विजयी ठरले. टेनिस व हॉकीमध्येंहि आपल्या खेळाडूंनीं नैपुण्य दाखविलें.

'जीवन कल्याण' नें गणेशोत्सव नित्याच्या उत्साहानें साजरा केला. 'मृच्छकटिक' नाटकाचा प्रयोग हें कार्यक्रमाचे महत्त्वाचें आकर्षण होतें. नाटकाच्या यशाचें बरेंचसें श्रेय मराठी रंगभूमीचे भीष्माचार्य नटश्रेष्ठ श्री. गणपतराव बोडस यांच्या दिग्दर्शनाला आहे.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील माझे सहकारी. मला सतत आपलें मार्गदर्शन, सल्ला व पाठिंबा देत आले आहेत. याबद्दल त्यांचें या प्रसंगीं मनःपूर्वक आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें कंपनीच्या हिताच्या दृष्टीनें आपण सर्वजण कामकाजांत कटाक्षानें व समंजसपणें लक्ष घालीत आहां याबद्दल आपणां सर्वांचें अगदीं मनःपूर्वक आभार मानण्यांत मला अतिशय आनंद होतो.

आपले ऊंसउत्पादक शेतकरी यांनीं आपणांला जें बहुमोल सहकार्य दिलें व देत आले आहेत त्याबद्दल त्यांचेहि कंपनीचा, चेअरमन या नात्यानें मी आभार मानतों.

शेवटीं, आपले जनरल मॅनेजर, श्री. एम. बी. लोहिया, यांच्या एकनिष्ठ व उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे असें मी माझ्या वतीनें, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या व आपल्याहि वतीनें म्हणण्याची परवानगी घेतों. कारखाना इतक्या चांगल्या प्रकारें चालविण्याची मुख्य जबाबदारी त्यांच्यावरच आहे आणि ती ते तितक्याच कार्यक्षमतेनें पार पाडीत आहेत. त्याचप्रमाणें त्यांचे सहकारी अधिकारी, स्टाफ व कामगार यांच्याकडून जें एकनिष्ठ व तत्परतेचें सहकार्य मिळत आलें आहे त्याचाहि उल्लेख करणें जरूर आहे.

आतां सन १९६३–६४ चा ताळेबंद व नफातोटापत्रकें मंजूर करण्यांत व स्वीकारण्यांत यावीं असें मी सुचवितों.

दिनांक, ३० डिसेंबर १९६४ इसवी.

( इंग्रजी भाषणाचा गोषवारा )

## सहकारी संस्थांच्या बँकिंगच्या व्यवहारांचें नियंत्रण

कांहीं विशिष्ट सहकारी सोसायट्यांच्या बँकिंगच्या व्यवहाराचें नियंत्रण करण्यासाठी अर्थमंत्र्यांनीं लोकसभेंत एक बिल मांडलें आहे. त्याचें नांव " दि बँकिंग लॉज ( ॲप्लिकेशन टु को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ) बिल " आहे; त्यामुळें १९३४ चा रिझर्व्ह बँक कायदा आणि १९४९ चा बँकिंग कंपन्यांचा कायदा, ह्यांत दुरुस्ती होणार आहे. बँकिंग कंपन्यांचा कायदा सध्यां सहकारी बँकांना लागू नाहीं. सहकारी बँकांच्या ठेवी आणि खेळतें भांडवल ह्यांत आतां एवढी वाढ झाली आहे, कीं त्यांना बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदी लागू करणें अगत्याचें झालें आहे. त्याचप्रमाणें, रिझर्व्ह बँक कायद्यांतीलहि कांहीं तरतुदी सहकारी बँकांना लागू करायला हव्यात. राज्य सहकारी बँका, मध्यवर्ती सहकारी बँका आणि कांहीं विशिष्ट प्राथमिक बिगर-शेतकी सहकारी बँका हीं आतां बँकिंग विषयक मध्यवर्ती सरकारच्या कांहीं तरतुदींच्या कक्षेंत येतील.

## चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत पाळावयाचीं पथ्यें

म्हैसूर राज्यांतील एका व्यापारी संघटनेचें ४ थें अधिवेशन बंगलोर येथें भरविण्यांत आलें होतें. अधिवेशनांत नियोजन समितीचें सभासद डॉ. व्ही. के. राव ह्यांनीं भारताच्या चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाबाबत कांहीं मौलिक विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, चौथा कार्यक्रम किती मोठा अगर लहान असावा हा कांहीं सर्वांत महत्त्वाचा प्रश्न नाहीं. कार्यक्रमांत करण्यांत येणाऱ्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या नफ्याचा दर वाढविणें आणि उत्पादनांत वाढ करणें हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या कार्यक्रमांत तीन गोष्टींकडे लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे. पहिली अशी, कीं हातीं घेतलेलीं सर्व कामें पूर्ण करण्यांत आलीं पाहिजेत. आज अस्तित्वांत असलेल्या सर्व उत्पादनक्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे ही दुसरी; आणि ज्या कामांमुळें फलनिष्पत्ति लवकर दिसेल अशा कामांना प्राधान्य देण्यांत आलें पाहिजे ही तिसरी. लवकर फलप्रद होणारीं कामें आणि दीर्घकालानंतर लाभदायी होणारीं कामें ह्यांच्यांत करण्यांत येणाऱ्या गुंतवणुकींत समतोलपणा राखण्यांत आला पाहिजे. दीर्घकालीन योजना उत्पादक साधनें वाढविण्याच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त असतात हें खरें असलें तरी त्यांच्यावर वाजवीपेक्षा अधिक जोर देणें योग्य ठरणार नाहीं. सार्वजनिक विभागांत होणाऱ्या भांडवलाच्या गुंतवणुकीवर सुटणारा नफा हेंच गुंतवणुकीच्या यशाचें गमक धरण्यांत आलें पाहिजे. आर्थिक दृष्ट्या लाभदायक न ठरणाऱ्या कामांत लोकमताच्या दाबानें पैसा गुंतविण्यांत आला तर देशाची प्रगति न होतां तो अधिकच मागास होण्याची शक्यता दृष्टीआड करून चालणार नाहीं. सार्वजनिक मालकीच्या विभागालाहि आर्थिक नियम पाळण्याची आवश्यकता आहे.

## परदेशीय चलनाच्या व्ययाचा तपशील

औद्योगिक विकास साधण्यासाठी, धान्यासाठी आणि इतर कारणांसाठीं लागणाऱ्या परदेशीय चलनाचा तुटवडा भारताला नेहमींच भासत असतो. परदेशांत जाणारे उद्योगपति अगर इतर धंदेवाईक लोक ह्यांच्यापायीं पुष्कळ परदेशीय चलन वापरलें जातें असा समज सर्वत्र दिसून येतो. पण, ह्यासंबंधींचे आंकडे ह्या अज्ञानमूलक भ्रमाचा निरास करणारे आहेत. उद्योगपति अगर व्यापारी ह्यांच्यापेक्षा परदेशांत जाणारे विद्यार्थीच परदेशीय चलन फार मोठ्या प्रमाणावर खर्च करतात. १९६१–६२ ते १९६३–६४ ह्या तीन वर्षांच्या काळांत भारतामधून परदेशांत गेलेल्या विद्यार्थ्यांनीं ३३.३ कोटी रुपयांचें परदेशीय चलन खर्च केलें. गेल्या तीन वर्षांत शिक्षणासाठी १३.७ कोटी रुपयांचें परदेशीय चलन खर्ची पडलेलें आहे. परदेशीं शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी पुष्कळदा भारतांत परत येत नाहींत अशी जाहीर तक्रार करण्यांत आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खर्च झालेली परदेशीय हुंडणावळ वायां गेली असेंच म्हणावें लागेल. शिक्षणाखालोखाल हाजला जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंनीं परदेशीय चलन फस्त केलें. ह्या यात्रेवर ७.४ कोटी रुपयांचें चलन संपलें. व्यापार व उद्योगधंद्यासाठी जाणाऱ्या लोकांना ३.७ कोटी रुपयांचें चलन मंजूर करण्यांत आलें होतें. त्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या परदेशगमनासाठी ९० लाख रुपयांचें चलन आणि आरोग्याच्या कारणासाठी परदेशांत जाणाऱ्या रोग्यांसाठी ९० लाख रुपयांचें चलन मंजूर करण्यांत आलें होतें. इतर कारणांसाठी खर्च झालेल्या परदेशीय चलनाचा आंकडा ६.७ कोटी रुपयांचा आहे. बेकायदा रीतीनें मिळविलेलें व खर्च केलेलें चलन अर्थातच निराळें.

**तांत्रिक शोधांमुळें झालेली बचत**—नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्या संस्थेनें लावलेल्या तांत्रिक शोधांमुळें भारताच्या परदेशीय चलनावरील ताण कमी होण्यास मदत होत आहे. संस्थेच्या १० वार्षिक अहवालांत ह्यासंबंधीं देण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें १९६३–६४ सालीं अशा शोधांमुळें १·८२ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली. त्यामागील वर्षी १·३० कोटी रुपयांचें चलन वांचलें होतें.

**पुस्तकांच्या देवाणघेवाणींत सहकार्य**—भारत आणि रशिआ ह्यांच्यांतील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविण्यासाठीं एका संयुक्त–मंडळाची स्थापना करण्यांत आली आहे. रशिआंतील पाठ्यपुस्तकांचीं रूपांतरें भाषांतरें, प्रकाशनें व वितरण करण्याचें कार्य मंडळाकडे सोपविण्यांत यावयाचें आहे. रशिअन पुस्तकांप्रमाणेंच इंग्रजी व हिंदी भाषांतील पुस्तकांचा रशिअन भाषेंत प्रसार करण्याचें कामहि मंडळ करील.

**नाट्यगृहासाठीं मदत नाहीं**—पुणें महानगरपालिकेनें नाट्यगृहाच्या बांधणीसाठीं भारत–सरकारकडे ६ लाख रुपयांची मदत मागितली होती. परंतु सरकारनें ही मदत देण्याचें नाकारलें आहे. मराठी रंगभूमीवरील विख्यात नट श्री. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व ह्यांच्या नांवानें नाट्यगृह बांधण्याचा संकल्प करण्यांत आलेला आहे. नगरपालिकांना नाट्यगृहासाठीं मदत देण्याची सोय सरकारी नियमांत नाहीं असें कारण दाखविण्यांत आलें आहे.

**नेपाळला रशिआची मदत**—नेपाळमध्यें सिमेंटचा कारखाना काढण्याच्या दृष्टीनें रशिअन तज्ज्ञांचें एक मंडळ अनेक ठिकाणांची पाहणी करणार आहे. नेपाळांत सिमेंटचा कारखाना काढण्यासाठीं पूर्वी चीननें मदत देऊं केली होती. परंतु नंतर मदत नाकारण्यांत आली. असा कारखाना काढण्याच्या कामांत तांत्रिक अडचणी आहेत असें सांगण्यांत आलें.

**शास्त्रज्ञांमधील बेकारी**—गेल्या वर्षीच्या १ जुलैपर्यंत भारतांत २९५ शास्त्रज्ञ बेकार होते. त्यांपैकीं बहुतेक जण उच्च लायकीचे आणि परदेशांत शिकून आलेले होतें. पैकीं २५० शास्त्रज्ञांना पहिल्या श्रेणीच्या तात्पुरत्या नोकऱ्या देण्यांत आल्या. आणखी १० जणांची योग्य जागांसाठीं निवड करण्यांत आली. शास्त्रज्ञांना योग्य त्या नोकऱ्या मिळाव्या म्हणून सरकारी खात्यांना उद्योगधंद्यांना, सार्वजनिक कॉर्पोरेशन्सना व विद्यापीठांना मुद्दाम कळविण्यांत येतें.

**गळ्यांतील व तोंडांतील कॅन्सर**—गळ्यांतील व तोंडांतील कॅन्सरचें लवकर निदान करतां यावें म्हणून इंडिअन कॅन्सर सोसायटी एक इलेक्ट्रॉनिक सूक्ष्मदर्शक मिळविण्याच्या प्रयत्नांत आहे. या सूक्ष्मदर्शकासाठीं २ लाख रुपये खर्च येईल. दक्षिण भारतांत आणि मुंबईंत गळ्यांतील व तोंडांतील कॅन्सरचे रोगी वाढत आहेत. पान चघळण्याची संवय हें त्याचें कारण आहे असें म्हणतात.

**परदेशीय मदत न लागण्याचा समय**—नियोजन-समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांच्या अंदाजाप्रमाणें १९७२ नंतर भारताला परदेशीय मदतीची गरज लागणार नाहीं. सध्यां भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकीं बचतीचा भाग १३ टक्के आहे. एकूण गुंतवणूक १६ टक्के असल्यानें बचत व गुंतवणूक ह्यांत ३ टक्क्यांची तफावत पडते. ही तफावत परदेशांच्या मदतीनें भरून काढण्यांत येते. पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमानंतर मात्र बचत आणि गुंतवणूक ह्यांच्यांत समतोलपणा येईल, आणि त्यांचें प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या वीस टक्के राहील असा त्यांचा कयास आहे.


सरदारगृह

मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठीं सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्टें —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म–शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४१४ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
" विजय " नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# विविध माहिती

**आंध्र प्रदेशांतील वीजकेंद्र**—आंध्र प्रदेशांत रामगुंडम् ह्या ठिकाणीं उष्णतेवर चालणारें एक वीजनिर्मिति केंद्र जपानच्या साह्यानें उभारण्यांत येणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या २·२ कोटी डॉलर्सच्या कर्जाला जपाननें मंजुरी दिली आहे. कर्जाचा उपयोग करून जपानकडून जरूर ती यंत्रसामग्री आयात करण्यांत येईल. जपानमधील सुप्रसिद्ध मित्सुबिशी उद्योगगटानें यंत्रसामग्री तयार करण्यास आरंभ केला आहे. जपानचें कर्ज २० वर्षांच्या मुदतीचें आहे. केंद्रासाठी परदेशीय चलनांतील खर्चाशिवाय ६·५ कोटी रुपये खर्च येईल.

**योगिक संस्थांना मदत**—लोणावळा येथील कैवल्यधाम योगिक संशोधनविषयक संस्थेला भारत सरकारनें ३७ हजार रुपयांची मदत मंजूर केली आहे. नाकाचे विकार आणि पचनाचे विकार ह्यांवरील योगिक इलाजांच्या संशोधनासाठी मदतीचा वापर करण्यांत यावयाचा आहे. मुंबई येथील सांताक्रूझ योग-संस्थेलाहि १३,५०० रुपयांची मदत मंजूर करण्यांत आली आहे. तिचा उपयोग रोगचिकित्साविषयक साधनें घेण्यासाठीं करण्यांत येईल.

**रुपयाची किंमत घटलीच**—अलाहाबाद येथील एका प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञानें कांहीं महिन्यांपूर्वी भारतीय रुपयाची किंमत पूर्वीच्या मानानें फक्त १७ पैसेच राहिली आहे असा अभिप्राय व्यक्त केला होता. त्याच्या ह्या विधानाला रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनीं पाठिंबा दिला आहे. ते म्हणतात कीं, १९१४ सालीं एका रुपयाला जितका माल मिळत असे त्याच्या एकषष्ठमांशच माल सध्यां मिळूं शकतो, ही वस्तुस्थिति आहे. रुपयाची किंमत वाढवावयाची असेल तर अनेक चलनविरोधी उपायांचा अवलंब करण्यांत आला पाहिजे.

**गर्भप्रतिबंधक साधनांची निर्मिति**— मध्यप्रदेशाच्या सार्वजनिक आरोग्यखात्यातर्फे कुटुंब-नियोजन ह्या विषयासंबंधीं एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. परिसंवादाला मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर उपस्थित होत्या. त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, गर्भप्रतिबंधक साधनांची निर्मिति करणारा एक कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या कारखान्यांतून तयार होणारीं साधनें मोफत न दतां नाममात्र किंमत घेऊन द्यावीं अशी सूचना करण्यांत आला आहे.

**मसाल्याच्या पदार्थांची निर्यात**—गेल्या महिन्यांत पॅरिसमध्यें अन्नपदार्थांचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. भारताच्या मसाला निर्यात मंडळानें भारतीय अन्नपदार्थ तयार करतांना वापरण्यांत येणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांचीं पाकिटें प्रदर्शनांत मोफत वाटलीं. त्यामुळे हा मसाला वापरून हिंदी खाद्यपदार्थ तयार करण्याच्या बाबतींत पुष्कळ फ्रेंच नागरिकांची जिज्ञासा जागृत झाली. कांहीं फ्रेंच रेस्टॉरंट्समधून आतां हिंदी खाद्यपदार्थ मिळण्याची सोय होणार आहे.

**औद्योगिक सहकार्याला भरपूर वाव**—भारतामधील उद्योगपतींचें एक मंडळ आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेलें होतें. हिंदी उद्योगधंद्यांना आफ्रिकेंतील देशांशीं सहकार्य करून बरीच कारखानदारी उभारतां येईल असा अहवाल मंडळानें भारत सरकारला सादर केला आहे. भारतीय उद्योगपतींनीं ह्या संधीचा उपयोग न केल्यास इतर देशांतील उद्योगपती पुढें सरसावतील असा इशाराहि मंडळानें दिला आहे.

**अन्नपदार्थांमधील भेसळ**—अन्नपदार्थांमधील भेसळ थांबविण्यासाठी आसाम सरकारनें तांतडीनें हालचाली करण्यास प्रारंभ केला आहे. संशयित पदार्थ पकडल्यावर त्यांची जागच्या जागीं परीक्षा करण्यासाठी दोन फिरत्या प्रयोगशाळा उभारण्यांत आल्या आहेत. शिलाँगमधील आरोग्यखात्याकडे भेसळीचीं १,७५७ प्रकरणें गेल्या सालीं गेलीं होतीं. त्यांपैकी ३९ टक्के प्रकरणांत भेसळ असल्याचें आढळून आलें.

**बंदरांतील खोळंब्यामुळें भुर्दंड**—अमेरिकेकडून भारताला करण्यांत येणारा अन्नधान्याचा पुरवठा बंदरांत बाजवीपेक्षा अधिक वेळ पडून राहिल्यानें भारत सरकारला गेल्या ११ महिन्यांत ४७·६१ लाख रुपयांचा भुर्दंड भरावा लागला. ह्यापैकी ३० लाख रुपये मुंबई बंदरांतील बोटींच्या खोळंब्यामुळें भरावे लागले. ह्या बंदरांतून बोटींची गर्दी तर झालीच होती, पण धान्य उतरणाऱ्या कामगारांनीं काम हळू करण्याचें धोरण स्वीकारल्यामुळें त्या रकमेंत बरीच वाढ झाली.

**नागार्जुनसागर धरणाचा खर्च**—आंध्रमधील नागार्जुनसागर धरणाच्या खर्चासाठी मध्यवर्ती सरकारनें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत १३ कोटी रुपये कर्ज देण्याचें ठरविलें आहे. नवीन कर्ज जमेस धरून ह्या धरणासाठीं होणाऱ्या खर्चाचा आंकडा आतां ९१ कोटी रुपयांवरून १०४ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

**विक्रीकराची चुकवाचुकव**—ओरिसा पोलिसांच्या दक्षता शाखेनें राज्यांतील विक्रीकराची झालेली मोठ्या प्रमाणावरील चुकवाचुकव उघडकीस आणली आहे. गेल्या सप्टेंबरअखेर संपलेल्या ९ महिन्यांत १५ लाख रुपयांचा विक्रीकर चुकविण्यांत आल्याचें आढळून आलें आहे. सप्टेंबर महिन्यांतच ९ अधिकाऱ्यांवर खटले भरण्यांत आले. त्यांपैकीं ५ गॅझेटेड अधिकारी आहेत.

**पाकिस्तानला कॅनडाची मदत**—अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करण्यासाठी पाकिस्तानला कॅनडाकडून मदत मिळणार आहे. ह्यासंबंधींच्या प्राथमिक करारावर नुकत्याच सह्या झाल्या. संकल्पित अणुवीजकेंद्रांत १ लाख, ३२ हजार किलोवॅट वीज निर्माण करण्यांत यावयाची आहे. केंद्र कराचीपासून १५ मैलांवर उभारण्यांत येणार आहे. त्यासाठी कॅनडा ६ कोटी डॉलर्सचें साह्य देणार आहे.

**भरती-ओहोटीच्या साह्यानें वीज-निर्मिति**—भरती-ओहोटीच्या जोराचा उपयोग करून वीजनिर्मिति करतां येणें शक्य आहे. मात्र त्यासाठी लाटांची उंची सुमारें १० फुटांपर्यंत असली पाहिजे. गुजरातच्या किनाऱ्यावर भावनगरजवळ एक जागा ह्या दृष्टीनें सोयीस्कर आहे अशी माहिती मध्यवर्ती सरकारचे पाणीपुरवठा व वीजमंत्री श्री. राव ह्यांनीं सांगितली; परंतु अशा मोक्याच्या जागा जगांत फारच थोड्या आहेत अशीहि माहिती त्यांनीं दिली.

**संततिप्रतिबंधक औषधें**—संतति प्रतिबंध करण्यांत यशस्वी ठरलेलीं तोंडानें घेण्यासारखीं कांहीं औषधें कारखानदारांनीं तयार केलीं आहेत. पण ह्या औषधांचा सतत वापर केल्यानें वाईट परिणाम होण्याची भीति दूर झालेली नाहीं. अशा प्रकारचीं औषधें बाजारांत येऊं देण्याविषयींचा निर्णय सरकारनें अद्याप घेतलेला नाहीं.

## नोकरी करणाऱ्या विवाहित महिला

महिला आणि नोकरी हा जितका चर्चेचा विषय बनला आहे, तितकाच विवाहित महिला व नोकरी हा औत्सुक्य विषय सगळीकडे झाला आहे. मग ती समस्या भारतांतील असो अथवा एखाद्या युरोपियन देशांतील असो; फरक इतकाच कीं, युरोपियन देशांत सुशिक्षित महिलांचें प्रमाण जास्त पडतें. तथापि वैवाहिक जीवन आणि नोकरी यांच्या द्वंद्वांतून निर्माण होणारे प्रश्न मात्र दोन्ही ठिकाणीं बव्हंशानें सारख्या स्वरूपाचे राहणार यात शंका नाहीं.

नेदरलंड्समधील ' इन्स्टिट्यूट फॉर इफिशिअन्सी ' या संस्थेनें अलिकडेच एक व्यापक सामाजिक पाहणी केली. पाहणींतून पुढें आलेली आंकडेवारी आणि निष्कर्ष मोठे उद्बोधक आहेत. भारतीय समाजांतील परिस्थितीशीं त्यांचें विवक्षित बाबतींत साम्य आढळतें व म्हणून ते येथें देण्यांत येत आहेत.

वरील संस्थेनें या बाबतींत एक प्रश्नावली तयार केली होती व ती अनेक संस्थाचालकांच्याकडे पाठविण्यांत आली. विवाहित महिलांना नोकऱ्यांवर घेतांना कोणतें धोरण ठेवलें जातें, येथपासून नोकरीस ठेविलेल्या महिला विवाहित असल्यामुळें कामाच्या बाबतींत कोणत्या अडचणी विशेषेकरून नेहमीं येतात, येथपर्यंतच्या प्रश्नांचा तिच्यांत समावेश होता.

नेदरलंड्समध्यें निम्म्यापेक्षा जास्त विवाहित महिला गिरण्या, कारखाने आणि औद्योगिक क्षेत्राच्या बाहेर, म्हणजे अन्यत्र नोकऱ्या करतात असें या पाहणींत आढळलें. प्रश्नावली पाठविलेल्या एकूण संस्थांपैकीं एक-तृतीयांश संस्थांकडून उत्तरें आलीं. तेथें काम करणाऱ्या एकूण कर्मचाऱ्यांत पुरुष व महिला यांचें प्रमाण साधारणपणें ६ : १ असें पडलें तर काम करणाऱ्या एकूण महिलांचें व त्यांच्यांतील विवाहित महिलांचें प्रमाण ५ : १ असें पडलें. त्याचप्रमाणें विवाहित महिला जर अननुभवी असेल तर तिला एकदम नोकरी दिली जात नाहीं. दीर्घकालीन पूर्वानुभव असल्यासच विवाहित महिलांना कामावर घेतलें जातें.

नोकरी करणाऱ्या विवाहित महिलांपैकीं निम्म्यापेक्षा कमी महिला अर्धवेळची नोकरी करतात, असें त्या प्रश्नावलीच्या उत्तरांवरून आढळलें. याचें प्रमुख कारण म्हणजे त्या माता असतात व मुलांचें संगोपन हें मातृकर्तव्य त्यांच्या गळ्यांत असतें.

अविवाहित महिलांपेक्षा विवाहित महिलांच्या कामाचा दर्जा कोणत्याहि दृष्टीनें निकृष्ट नसतो. तथापि गैरहजेरीचें प्रमाण मात्र त्यांच्या बाबतींत अधिक असतें, असें आंकडेवारीनें दिसून आलें. उलट, विवाहित महिलांत कामाच्या जबाबदारीची जाणीव कुमारी कर्मचाऱ्यांपेक्षा पुष्कळच अधिक असते असें चालकांनीं म्हटलें आहे. त्यांचें काम नीटनेटकें, पद्धतशीर व व्यवस्थित असतें.

ज्या मोठमोठ्या संस्थांत किंवा औद्योगिक केंद्रांत कामाच्या पाळ्या असतात तेथें विवाहित महिलांना सोइस्करपणें काम करतां येतें. कारण, स्वतःच्या घरीं जेव्हां सांसारिक जबाबदारी म्हणून त्यांच्या उपस्थितीची आवश्यकता असते तेवढा वेळ वगळून इतर वेळच्या पाळ्या त्या पत्करूं शकतात.

विवाहित स्त्रिया आणि पूर्ण वेळचें अथवा अर्धवेळचें काम याबाबतच्या अनेक गोष्टींवर वरील निष्कर्षांमुळें प्रकाश पडतो. आपल्याकडे नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळें या निष्कर्षांचा फायदा होण्यासारखा आहे.

मोठा कारखानदार, व्यवहारचतुर व्यापारी, भिरभिरत कारकून, मीठ-मिरचीच्या डब्यांत चार-दोन नाणीं टाकणारी गृहिणी, महत्त्वाकांक्षी विद्यार्थी, नियमित बचत करणारे पगारदार, कामगार, शेतकरी—

असे अनेकजण !

यांपैकी प्रत्येकाला सांगण्यासारखं आणि अंतिम हिताकरितां देण्यासारखं कांहीं ना कांहीं आमच्याकडे आहे. तुमच्या आर्थिक सुबत्तेचा पाया म्हणजे ' बचत ' आणि त्यासाठी सल्ला व व्यवस्था यांसाठी ही तुमची बँक म्हणजे निर्धास्तता !

बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

ठेवींची रक्कम २८० लक्ष रु. हून अधिक

२

स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, १ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,२०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.